**महाराष्ट्र शासन**

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,चंद्रपूर**

***Government Medical College,Chandrapur,***

*Govt, T.B. Hospital Campus, Ramnagar , Chandrapur - 442401, M.S. (INDIA)*

Telephone No.:- 07172- 277104 Fax No.:- 07172- 277103

Website :- www. gmcchandrapur.org Email :– gmcchandrapur@gmail.com

---

**जा.क्र.शावैमचं/वि.आस्था/क.नि,व.नि.,ट्युटर/जाहीरात/ 306 /२० दिनांकः- 13/०१/२०२०**

## जाहिरात

**विषयः– शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,चंद्रपूर येथे (फेब्रुवारी-२०२० ते जुलै-२०२०) सत्रासाठी कनिष्ठ निवासी, वरिष्ठ निवासी व ट्युटर ही पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात भरणे बाबत.**

संदर्भ :–१) शासन निर्णय क्र. पदनि २०१४/ प्र.क्र.१९/वैसेवा-२, दिनांक २९/१२/२०१४.

२) या कार्यालयाची मंजूर टिप्पणी दिनांक १३/०१/२०२०.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,चंद्रपूर येथे खालील विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे (फेब्रुवारी-२०२० ते जुलै-२०२०) या सत्रासाठी कनिष्ठ निवासी, वरिष्ठ निवासी व ट्युटर यांची रिक्त पदे भरण्यांकरिता योग्य त्या अर्हता प्राप्त उमेदवारांकडून अर्ज मागविण्यांत येत आहेत.

त्यासाठी खालीलप्रमाणे जाहीरात देण्यात येत आहे.

**पदाचे नाव :– कनिष्ठ निवासी**

| अ. क्र. | विभागाचे नाव | रिक्त पदे | अ. जा. | अ. ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा. व. | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | औषधवैद्यकशास्त्र | ८ | १ | १ | .. | १ | .. | .. | १ | ४<br>२ म |
| २ | क्षयरोग व छातीविकार | १ | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | १ |
| ३ | त्वचा व गुप्तरोगशास्त्र | १ | .. | .. | .. | .. | .. | .. | १ | .. |
| ४ | मनोविकृत्तीशास्त्र | १ | १ | .. | .. | .. | .. | .. | .. | .. |
| ५ | बालरोगशास्त्र | ४ | .. | १ म | .. | .. | .. | .. | १ | २<br>१ म |
| ६ | शल्यचिकित्साशास्त्र | ८ | १ | .. | .. | .. | १ | १ | १ | ४<br>२ म |
| ७ | अस्थिव्यंगोपचारशास्त्र | ४ | .. | .. | १ | .. | .. | .. | १ म | २ |
| ८ | कान, नाक,घसाशास्त्र | १ | .. | .. | .. | .. | .. | .. | | १ |
| ९ | नेत्रशल्यचिकित्साशास्त्र | १ | .. | .. | .. | .. | .. | .. | | १ |
| १० | स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र | ४ | १ म | .. | .. | .. | .. | .. | १ | २ म |
| ११ | बधिरीकरणशास्त्र | ४ | १ | .. | .. | .. | .. | .. | १ | २<br>१ म |
| १२ | दंतशल्यचिकीत्साशास्त्र | १ | .. | .. | .. | .. | .. | .. | १ म | .. |
| | एकूण | ३८ | ५ | २ | १ | १ | १ | १ | ८ | १९ |

पदाचे नाव :- वरिष्ठ निवासी

| अ. क्र. | विभागाचे नाव | रिक्त पदे | अ. जा. | अ. ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा. व. | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | औषधवैद्यकशास्त्र | ४ | १ | .. | .. | .. | .. | .. | १ | २<br>१ म |
| २ | क्षयरोग व छातीविकार | १ | .. | .. | .. | .. | .. | .. | १ | .. |
| ३ | त्वचा व गुप्तरोगशास्त्र | १ | .. | .. | १ | .. | .. | .. | .. | .. |
| ४ | मनोविकृत्तीशास्त्र | १ | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | १ |
| ५ | बालरोगशास्त्र | २ | १ म | | .. | .. | .. | .. | .. | १ |
| ६ | शल्यचिकित्साशास्त्र | ४ | .. | .. | .. | .. | १ | .. | १ | २<br>१ म |
| ७ | अस्थिव्यंगोपचारशास्त्र | २ | .. | १ | .. | .. | .. | .. | .. | १ |
| ८ | नेत्रशल्यचिकित्साशास्त्र | १ | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | १ म |
| ९ | बधिरीकरणशास्त्र | २ | .. | .. | .. | .. | .. | .. | १ | १ |
| १० | क्षकिरणशास्त्र | २ | १ | .. | .. | .. | .. | .. | .. | १ म |
| | एकूण | २० | ३ | १ | १ | ० | १ | ० | ४ | १० |

पदाचे नाव :- ट्युटर

| अ. क्र. | विभागाचे नाव | रिक्त पदे | अ. जा. | अ. ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा. व. | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | शरीररचनाशास्त्र | ३ | .. | १ | .. | .. | .. | .. | .. | २<br>१ म |
| २ | शरीरक्रियाशास्त्र | ३ | १ | .. | .. | .. | १ म | .. | .. | १ |
| ३ | जीवरसायनशास्त्र | ३ | .. | .. | १ | .. | .. | .. | १ म | १ |
| ४ | औषधनिर्माणशास्त्र | २ | १ म | .. | .. | .. | .. | .. | .. | १ |
| ५ | विकृत्तीशास्त्र | ४ | .. | १ | .. | .. | .. | .. | १ | २<br>१ म |
| ६ | सुक्ष्मजीवशास्त्र | ३ | १ | .. | .. | .. | .. | .. | .. | २<br>१ म |
| ७ | न्यायवैद्यकशास्त्र | २ | .. | .. | .. | .. | .. | .. | १ | १ |
| ८ | रोगप्रतिबंधक व सामाजीक औषधवैद्यकशास्त्र | ३ | .. | .. | .. | .. | .. | .. | १ | २<br>१ म |
| | एकूण | २३ | ३ | २ | १ | ० | १ | ० | ४ | १२ |

१) अर्ज मिळण्याचे ठिकाण :-
मा.अधिष्ठाता यांचे कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,चंद्रपूर येथे कार्यालयीन वेळेत मिळतील.

२) अर्ज विक्री व अर्ज स्विकारण्याचा कालावधी:-
दि.१४.०१.२०२० ते दि.२३.०१.२०२० पर्यंत शासकीय सुट्टीचे दिवस वगळून सकाळी ११.०० ते दु.१.३० व दुपारी २.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत मिळतील.

३) अर्ज स्विकारण्याची अंतीम तारीख :-
दि.२४.०१.२०२० रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत राहील. सायं. ५.३० वा. च्या नंतर आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

४) मुलाखत दिनांक :-

४.१) मुलाखत **दि.२९.०१.२०२० वार बुधवार रोजी दुपारी १२.३० वाजता** मा.अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर यांच्या दालनात घेण्यात येईल.

४.२) मुलाखतीसाठी उमेदवारांना वेगळे पत्र पाठविले जाणार नाहीत.

४.३) मुलाखतीच्या वेळी सर्व मूळ प्रमाणपत्रे (Original-Certificates) सादर करणे आवश्यक आहे.

४.४) मुलाखतीस स्वखर्चाने हजर राहावे लागेल त्यासाठी कोणतेही भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.

५) अटी व शर्ती :-

५.१) उमेदवाराने अर्जासोबत सर्व कागदपत्रांच्या सांक्षाकींत प्रती जोडणे आवश्यक आहे.

५.२) अर्ज विहीत नमुन्यातच सादर करावा लागेल.अर्ज विहीत नमुन्यात नसल्यास किंवा अर्ज अपुर्ण असल्यास अर्ज स्विकारले जाणार नाही.

५.३) उमेदवार मागासवर्गीय असल्यास सक्षम अधिकाऱ्याचे जात प्रमाणपत्र,वैद्यता प्रमाणपत्र,तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून इतर सर्व मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याचे चालू वर्षाचे (Non Creamy layer) प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

५.४) उमेदवाराने कामावर रुजू होण्यापूर्वी त्यांच्या मूळ वेतना एवढी अनामत रक्कम (Caution Deposit) म्हणून रोखपाल यांच्याकडे भरणा करावी लागेल. तसेच पावतीची नोंद विद्यार्थी आस्थापना विभागाकडे करावी.अनामत रक्कम भरणा केल्याशिवाय कामावर रुजू करुन घेतले जाणार नाही.

५.५) उमेदवारास जर काही कारणास्तव राजीनामा द्यावा लागत असले तर एक महिना अगोदर पूर्व सूचना (Prior Intimation) विभाग प्रमुखांमार्फत या कार्यालयास सादर करावी लागेल. अन्यथा भरणा केलेली अनामत रक्कम (Caution Deposit) शासनखाती जमा करण्यात येईल.

५.६) वरील सर्व जागा पूर्ण वेळ आहेत.निवड झालेल्या उमेदवाराने २४ तास कर्तव्यावर उपस्थित असणे बंधनकारक राहील.

५.७) अंतीम निवड झालेल्या उमेदवारांना खाजगी संस्थेत,मंडळ,निमशासकीय कार्यालयामध्ये कोणत्याही प्रकारची नोकरी स्विकारता येणार नाही किंवा खाजगी व्यवसाय करता येणार नाही. जर तसे कार्यालयाच्या निदर्शनास आल्यास त्यांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

५.८) गुणवता यादी ही पदव्युत्तर व एमबीबीएस परिक्षेतील गुणांवर ठरविण्यात येईल तसेच पहिल्या प्रयत्नात उत्तीर्ण करणाऱ्यांना प्राधान्य देण्यात येईल.

५.९) वरील जाहिराती मधील पदांच्या संख्येत कमी-अधिक करण्याचा, आरक्षणामध्ये बदल करण्याचा व निवड झालेल्या उमेदवारांचे नियुक्ती आदेश निर्गमित करण्याचे अथवा प्रलंबित ठेवण्याचे अथवा नियुक्ती रद्द करण्याचे तसेच सदर जाहिरात रद्द करण्याचे अधिकार मा.अधिष्ठाता यांना राखुन ठेवण्यात आलेले आहेत.

६.०) जाहिरात दिलेल्या पदाची नियुक्ती तात्पुरत्या तदर्थ स्वरुपात असुन कोणतीही पुर्व सुचना व कोणतेही कारण न दर्शविता सेवा तात्काळ समाप्त करण्याचे अधिकार मा.अधिष्ठाता यांना असतील.

६.१ जे उमेदवार इतर संस्थेत कार्यरत आहेत त्यांनी सदर संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र सादर केल्या नंतरच नियुक्ती देण्यात येईल.

६.२) निवड झालेल्या उमेदवारांना **दि.०१.०२.२०२० म.पू.**पासून नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील.

१. शैक्षणिक पात्रता:- महाराष्ट्र आयुर्विज्ञान परिषद व भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकांनुसार.
२. बंधपत्रीत उमेदवारांना प्रथम प्राध्यान्य देण्यात येईल.
३. **वेतन** :- शासकीय नियमाप्रमाणे कनिष्ठ निवासी,वरिष्ठ निवासी पदासाठी विद्यावेतन व ट्युटर या पदासाठी वेतन अनुज्ञेय राहील.
४. महाराष्ट्र मेडीकल कॉन्सिल यांच्याकडे (MMC Registration) नोंदणी असणे आवश्यक.

**अर्जाची किंमत रु. २००/-**

**अधिष्ठाता,**
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,**
**चंद्रपूर**

**प्रति,**
**सूचना फलक,**
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,चंद्रपूर**

प्रत :- १) मा.संचालक,वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई यांना माहितीसाठी सादर
२) संबंधित विभाग प्रमुख, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,चंद्रपूर
३) सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य यांना सुचना फलकावर लावण्याकरीता सस्नेह सादर.